नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०४/२०२६ (सोमवार )**

---

## ३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धे मध्ये नागपूर ग्रामीण पोलीस दलाची उत्कृष्ट कामगिरी
## १ सुवर्ण, १ रौप्य आणि ८ कास्य पदकांसह एकुण १० पदके प्राप्त

३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा दिनांक २०/०४/२०२६ ते दिनांक २७/०४/२०२६ रोजी पर्यंत मुंबई शहर येथे पार पडल्या. आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी मा. ना. श्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत कलीना, मुंबई येथील सशस्त्र पोलीस प्रशिक्षण क्रिडा व कल्याण मुख्यालयाच्या क्रिडांगणावर सदर स्पर्धेचा सांगता समारोप पार पडला. सदर कार्यक्रमात मा. श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्यासह सर्व घटकप्रमुख उपस्थित होते.

सदर स्पर्धेत नागपूर ग्रामीण पोलीस दलातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण १० पदकांची कमाई केली असून नागपुर ग्रामीण जिल्हयाचा मान उंचावुन जिल्हयाचा गौरव वाढविला आहे. **यात १ सुवर्ण, १ रौप्य व ०८ कांस्य पदकांसह १० पदकांचा समावेश आहे.** पदके पटकारविणारे पोलीस अंमलदारांची नावे अनुक्रमे १) मपोअं ब.नं १९३५ कल्याणी वहीले यांनी वु—शु या खेळ प्रकारात **सुवर्ण पदक** पटकावले आहे. मपोअं ब नं १०९४ तमन्ना पटेल यांनी बॉक्सिंग मध्ये **रौप्य पदक** पटकावले असुन क्रं ३) नापोअं ब नं १९९९ एजाज शेख (वेटलिफ्टिंग), ४) पोअं ब नं ८४७ शुभम जाधव (तायक्वांदो), ५) पोअं ब नं १८९३ शुभम हुर्ले (तायक्वांदो), ६) मपोअं बनं १०६४ कोमल जुमडे (तायक्वांदो), ७) मपोअं बनं ६६३ पूजा अग्रवाल ( ॲथ्लेटिक्स १० कि.मी. क्रॉस कंट्री), ८) मपोअं बनं ८२५ प्रणाली रंदाई, ( ॲथ्लेटिक्स १० कि.मी. क्रॉस कंट्री ), ९) पोअं ब नं

१२७७ शुभम तिवसकर (ॲथ्लेटिक्स ८०० मीटर), आणि क्रं १०) पोअं ब नं २३७१ पंकज परतेती (पॉवर लिफ्टिंग) यांनी नमुद खेळप्रकारामध्ये **कास्य पदक** पटकावले आहे.

**या सर्व खेळाडूंनी कठोर परिश्रम, चिकाटी व शिस्त यांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.**



मपोअं कल्याणी वहीले



मपोअं तमन्ना पटेल




सुवर्ण पदाकासह महीला पोलीस अंमलदार कल्याणी वाहीले




रौप्य पदाकासह महीला पोलीस अंमलदार तमन्ना पटेल

# घरफोडीचे ३ गुन्हे उघड, २ आरोपी अटक
# ४ लाख ८० हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
# स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन केळवद येथील अप. क्र. ११/२०२६ कलम ३३१(३),३३१(४),३०५ (अ) भान्यासं दाखल गुन्हयात यापुर्वी केळवद पोलीसांनी अंकुश मडावी या आरोपीला अटक केली होती. सदर गुन्हयात पाहीजे आरोपी नामे कुदंन उर्फ कुदंनसिंग जुनी, रा. पांढुर्णा, जि. पांढुर्णा हा मिळुन येत नव्हता. पोलीस स्टेशन केळवद सह समांतर तपास करून स्थनिक गुन्हे शाखेचे पथक त्याच्या शोधात असतांना दिनांक २६/०४/२०२६ स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात उघड न झालेलया गुन्हयांचा तपासांसंदर्भात पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदाराने माहीती दिली की, आरोपी कुदंन उर्फ कुदंनसिंग जुनी हा त्याचे एका साथीदारासह सावनेर मार्केट परिसरात फिरत आहे. नमुद पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक ,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात **तात्काळ सापळा रचुन कारवाई करत नमुद आरोपी नामे १) कुंदनसिंग उर्फ कुंदन कालुसिंग जुनी वय ३४ वर्ष, रा.शास्त्री वार्ड पांढुर्णा जि. पांढुर्णा (मध्यप्रदेश) आणि २) जोगींदर उर्फे लुल्ला राजुसिंग भादा वय २७ वर्षे रा. रा.शास्त्री वार्ड पांढुर्णा जि. पांढुर्णा (मध्यप्रदेश) यांना सावनेर येथुन ताब्यात घेतले.** नमुद ताब्यात घेतलेल्या आरोपींना पोलीसांनी कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी मिळुन खापा पोलीस स्टेशन हद्दीत सुध्दा दोन घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली.

**पोलीसांनी आरोपीचे ताब्यातून १) सोन्या—चांदीचा ऐवज एकुण किंमती ४,८०,५००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असुन नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१) पोलीस स्टेशन खापा गुन्हे रजि.नं. १३६ /२६ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.

२) पोलीस स्टेशन खापा गुन्हे रजि.नं. ७७ /२६ कलम ३३१(४),३०५(अ) भान्यास

३) पोलीस स्टेशन केळवद गुन्हे रजि.नं.११/२६ कलम३३१(३),३३१(४),३०५(अ) भान्यास

**असे एकुण ०३ गुन्हे उघड झाले आहे.**

# मोटरसायकल चोरीचे ६ गुन्हे उघड, ७ मोटर सायकल जप्त
# ३ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त,आरोपी अटक,
# स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उघड न झालेलया गुन्हयांचा तसेच दिनांक २३/०२/२०२६ रोजी पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे दाखल मोटरसायकल चोरीच्या गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना दिनांक २६/०४/२०२६ तांत्रिक पुराव्यावरून आरोपी नामे **अमर पुरूषोत्तम मेश्राम, वय २८ वर्ष, रा. उमरी, ता. वरोरा, जि. चंद्रपूर यास खांबाडा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर** याची माहीती प्राप्त झाली. पोलीस पथकाने नमुद आरोपीला सापळा रचुन शिताफिने वरोरा येथुन ताब्यात त्याच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने विचारपुस केली असता त्याने नागपुर ग्रामीण, वर्धा आणि यवतमाळ जिल्हा येथे मोटरसायकल चोरीचे गुन्हे केल्याचे कबुल केले. नमुद कारवाईत मोटर सायकल चोरीचे एकुण ६ गुन्हे उघड झाले आहे.

**पोलीसांनी पंचासमक्ष विविध गुन्हयातील चोरीस गेलेल्या मोटर सायकल क्रं १) एम एच ४० ए डी ९११३, २) एम एच ४० बी वाय ३५६०, ३) एम एच ३२ ए एम ५९२४, ४) एम एच २९ ए एक्स २३२१, ५ )एम एच २९ ए जे ९९४६, ६ )एम एच २९ ए एक्स ३६४२ तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटर सायकल ७) एम एच ३४ सी जी १०५९ असा एकुण ३,२५,०००/—रूपये असा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला अटक केली असुन इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.**

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१). पो.स्टे. बुटीबोरी अप.क. १६८/२६ कलम ३०३(२) भान्यासं

२). पो.स्टे. बुटीबोरी अप.क. १६४/२४ कलम ३०३(२) भान्यासं

३). पो.स्टे. समुद्रपुर, जि. वर्धा अप.क. २६७/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. ,

४). पो.स्टे. वणी जि. यवतमाळ अप.क. ५७७/२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. ,

५). पो.स्टे. पांढरकवडा, जि. यवतमाळ अप.क. ३३५/२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. ,

६). पो.स्टे. वडकी, जि. यवतमाळ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. ,

**असे एकुण ६ गुन्हे उघड झाले आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमाल**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद, ४५ लाख ४५ हजरांचा मुद्देमाल जप्त भिवापुर पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक २६/०४/२०२६ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी अनुक्रमे मौजा तास कॉलनी शिवार आणि मौजा कारगाव शिवार येथे नाकाबंदी केली असता मौजा कारगाव शिवार येथे टिप्पर ट्रक क्र एम एच ३४ बि .झे ८६८६ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी क्रं १) जावेद जमीर खान वय २५ वर्ष रा जि नागपुर** हा मिळुन आला. त्याला वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **आरोपी क्रं २) वाहन मालक सूमित जिभकाटे, रा.दिघोरी, जि नागपुर** याच्या सांगणेवरून अवैधरित्या रेतीची अवैधरित्या वाहतुक करीत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष एक**

**टिप्पर ट्रक क्र एम एच ३४ बि .झे ८६८६ आणि ८ ब्रास रेती असा एकुण किमती ४०,४०,००० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

मौजा तास कॉलनी शिवार येथे एक ट्रॅक्टर क्र एमएच ४९ बीजे ७९२९ आणि त्याला जोडलेली ट्राली क्र एमएच ३४ एल ७४६० मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी क्रं **१) सचीन विलास राउत वय ३० वर्ष रा आमगाव ता भिवापुर जि नागपुर** हा मिळुन आला. त्याला वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **आरोपी क्रं २) वाहन मालक प्रफुल अबादे, रा. भिवापुर, ता. भिवापुर, जि. नागपुर** याच्या सांगणेवरून अवैधरित्या रेतीची अवैधरित्या वाहतुक करीत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष एक ट्रॅक्टर क्र एमएच ४९ बी जे ७९२९ आणि त्याला जोडलेली ट्राली क्र एमएच ३४ एल ७४६० आणि १ ब्रास रेती असा एकुण किमती ४,०५,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद दोन्ही कारवाई दोन वाहनासह ९ ब्रास रेती असा एकुण ४४,४५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरीत्या विनापरवाना देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद,
## ६ लाख ६६ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २७/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुप्त बामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, कारने अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद पथकाने पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील मौजा रामटेक श्रीराम शाळेजवळ नाकाबंदी केली असता मारूती स्विफ्ट डीझायर

कार क्र. एम एच ४०/सी क्यु ३७११ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात देशी दारू मिळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे १) हरीश वामनकटु काळे, वय २८ वर्ष, रा. रामटेक व सोबत २) शैलेश जगदीश भोंडे, वय ४५ वर्ष, रा. रामटेक** हे अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष १) १२३२ देशी दारूच्या निपा किंमती ६६,५६०/— रूपये आणि मारूती स्विफ्ट डीझायर कार क्र. एम एच ४०/सी क्यु ३७११ किंमती ६,००,०००/—रूपये असा एकुण किंमती ६,६६,५६०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **नमुद आरोपींविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमाल**

## अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांना पायदळ घेवुन जाणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा नोंद
## १६ गोवंश जनावरांची सुटका,केळवद पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक २६/०४/२०२६ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, ०३ इसम सांवंगा ता सौंसर मध्यप्रदेश येथुन काही बैलांना आखुड दोरीने गळ्याला एका सोबत चार बैल अशा प्रकारे अत्यंत क्रुरतेने बांधुन तसेच तुतारी ने त्यांना टोचुन कत्तली करीता ढालगाव मार्गे खापा येथे पायदळ घेवुन आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा ढालगाव शिवार येथे

सापळा रचुन कारवाई केली असता दिनांक २६/०४/२६ चे ०९/१५ ते ०९/५० वाजेच्या सुमारास ३ इसम निर्दयतेने गोवंश जनावरे घेवुन येतांना दिसले. पोलीसांनी त्यांना नाव पत्ता विचारले असता **आरोपी क्रं १) शरद मोतीराम कडक, वय ४७ वर्ष २) कुशाल पांडुरंग तिबोले. वय ४० वर्ष आणि ३) सतिष मधुकर कडक वय ३९ वर्ष, तिन्ही रा. सावगा ता सौसर जि. पांढुणी (म.प्र)** अशी माहीती प्राप्त झाली. नमुद आरोपीतांना जनावरांच्या पावत्यांबाबत विचारना केली असता त्यांच्याकडे जनावरांबाबत काहीही कगदपत्रे नव्हती.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १६ गोवंश जनावरांची सुटका करण्यात आली. नमुद आरोपी विरूध्द  कलम ३(५), भान्यासं सहकलम ११ (१) (घ) (ङ), (च) प्राण्याना निर्दयतेने वागविणे प्रती.  सहकलम ५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली असुन केळवद  पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत आहेत.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक २६/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत खापा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी १) जानी भुखया शाहु, वय ४८ वर्ष, रा. पटेल चौक, गोंडगिरी छत्तीसगढ, ह.मु.दफई, ता. सावनेर हा मौजा खैरी पंजाब येथे तसेच २) आदित्य प्रकाश कोल्हे, वय २३ वर्ष, रा. गुमगाव माईन खापा, ता.सावनेर हा मौजा खापा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच **पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत हल्दीराम कंपनी मौजा सावळी शिवार येथे आरोपी केशव जंगलु शेंडे, वय ६३ वर्ष, रा. सावळी ता. कामठी, जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत मौजा काबुल कंधार दरगाह चिंचोली येथे पारशिवनी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी १) कमल अर्जुनदास गोकलानी वय ४४ वर्ष, रा. प्लाट नं. ३६५, गुरूनानक स्टोअर्सच्या बाजुला खामला चिंधी २) शुभम आनंदराव

ताळीकोटे, वय २७ वर्ष, रा. गौतम नगर, वस्ती खामला, नागपुर ३) बंटी सनमुखदास हेमनानी वय ६० वर्षे रा. सिंदी बस्ती, खामला, नागपुर जिल्हा नागपुर **हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. नमुद आरोपींवर कलम २७ एन. डी.पी.एस. कायदयान्वये ०६ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या,आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद

दिनांक २६/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १६,४३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे १) ज्ञानेश सिद्धार्थ पिल्लवान, वय ३६ वर्ष, रा. नागभिड जि.चंद्रपुर, ह.मु भारकस, ता. हिंगणा, जि.नागपुर २) ०२ महिला आरोपी याचेवर प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे १) गफफार अकबर अंसारी, वय ५६ वर्ष, रा. खापरी बारोकर २) श्रावन बापुराव अंबुडारे, वय ४२ वर्ष, रा. मुर्ती ३) संग्रामसिंग दिपकसिंग भोंड, वय २६ वर्ष, रा. सायखोड कोंढाळी ४) दीपकसिंग अनंतसिंग भोंडे, वय ५२ वर्ष, रा. सायखोड कोंढाळी यांचेवर प्रत्येकी ०१ असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी १) शुभम पांडुरंग गीरी, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, गुमथळा ता. कामठी जि. नागपुर २) जगेश्वर दादुनाथ पुंड, वय ५४ वर्ष, रा. महालगाव, ता. कामठी जि.नागपुर ३) भिमराव दादुनाथ पुंड, वय ५२ वर्ष, रा. महालगाव, ता. कामठी, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ असे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे सचिन रामेश्वर उके, वय २७ वर्ष, रा. धर्मापुरी, ता. मौदा याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे लखन दयाराम पोहनी, वय ५० वर्ष, रा. प्लाट नं. ६३, खामला जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे

आरोपी नामे १) रविंद्र इंगळे, वय ५२ वर्ष, रा. वासी, ता. भिवापुर, जि. नागपुर २) संघशिल मेश्राम, वय ३० वर्ष, रा. भगवानपुर, ता. भिवापुर, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे हरीदास मोतीराम मांढरे, वय ५० वर्ष, रा. चापेगडी, ता. कुही, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे पारस बच्चेराजसींग राठोड, वय ४४ वर्ष, रा. बुधवारी पेठ, उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १) १०२ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १२६०० मिली देशी दारू असा एकुण १६,४३०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**